म. ग्रं. सं. ठाणें
विषय काव्य
सं. नं. ८८०

स्थळप्रत
म. ग्रं. सं. ठाणें.



# मुलांचीं गाणीं.

कवि—श्री. नारायण केशव बेहेरे.

REFBK-0001703

# मुलांचीं गाणीं.

कवि—श्री. नारायण केशव बेहेरे.

REFBK-0001703

किंमत ४ आणे.

Printed & Published by Anant Atmaram Moramker at
his " Shri LaxmNarayan Press " 402,
Thakurdwar Bombay No. 2

# अर्पण पत्रिका.

श्री. एच. एस. स्टेली. एम्. ए.

विद्याधिकारी, नागपूर-विभाग.

यांस

विद्यार्थ्यांवर असलेल्या त्यांच्या

प्रेमामुळें सप्रेम

अर्पण.

दा. क्र. १७०३

# दोन शब्द.

१. **स्कूल बॉय लीग ऑफ ऑनर** ( School-boy-league of Honour ) ऊर्फ **सद्विद्यार्थी संघ** या संस्थेचें कार्य सुकर व्हावें, या हेतूनें हें लहानसें गाण्यांचें पुस्तक प्रसिद्ध करीत आहें. यांतील गाणीं खेड्यापाड्यांतील शाळांतून मुलांना शिकविण्यांत आलीं, तर संघाचा उद्देश लवकर तडीस जाईल. संघाचा प्रसार झाल्याशिवाय संघाचें ध्येय तडीस जाणार नाहीं. संघाचे नियम, व संघाच्या ध्येयाला अनुकूल असलेल्या गाण्यांचा या पुस्तकांत समावेश केला आहे. शिक्षकवर्ग या पुस्तकाचा उपयोग करून मुलांच्या मनांत संघाविषयीं गोडी उत्पन्न करतील व संघाच्या कार्याला हातभार लावतील अशी आशा आहे. कारण गाण्याचें शिक्षणविषयक महत्व त्यांना ठाऊक असते.

२. आपल्या विभागाचे विद्याधिकारी श्री. **स्टेली** यांचें विद्यार्थीवर्गावर असलेलें प्रेम, व खऱ्या खेळाडूस शोभणारा त्यांचा स्वभाव सर्वांच्या परिचयाचा आहेच. गेल्या २५ वर्षांत, कोणीही विद्याधिकारी मुलांत इतक्या मनमोकळे-पणानें मिळून मिसळून खेळल्याचें प्रस्तुत लेखकास आठवत नाहीं. त्यांनीं हें लहानसें पुस्तक अर्पण करण्याची परवानगी दिल्याबद्दल, त्यांचे आभार मानणें जरूर आहे.

३. 'प्रियकर हिंदुस्थान' व 'जय ब्रिटॅनिये' हीं अखेरचीं दोन गाणीं सोडून बाकीं सर्व प्रस्तुत लेखकानें लिहिलेलीं आहेत, व त्यांपैकीं कांहीं आनंद, खेळगडी वगैरे मुलांच्या मासिकांत पूर्वी प्रसिद्ध झालीं आहेत. बाकीचीं नवीन आहेत. गाण्यांच्या चाली मुलांना सहज ह्मणतां येतील अशाच निवडल्या आहेत. मुलांना तीं आवड-तील अशी आशा आहे. कारण गेल्या वर्षापासून वर्धा नार्मल स्कुलांतील व प्रॅक्टीसिंग स्कुलांतील विद्यार्थी, तीं मोठ्या हौसेनें ह्मणत असल्याचा अनुभव प्रस्तुत लेखकास आहे.

४. यांपैकीं अनेक गाणीं, पुलगांव, वरोडा, आरमोरी, मूल वगैरे दूरदूरच्या शाळांत, कांहीं माझ्या अनुमतीनें तर कांहीं तशींच, पूर्वी चालत गेलीं आहेत. आणि कित्येक शाळांकडून या गाण्यांची सारखी मागणीही होत आहे. हीं गाणीं घाईनें प्रसिद्ध करण्याचें हें देखील एक कारण आहे.

सर्वांचा नम्र

नारायण केशव वेहेरे
चिटणीस, सद्विद्यार्थी संघ
वर्धा.

नार्मल स्कूल
वर्धा.
१ जुलै १९१९.

---

[ १ ]

# राज–गीत

( चाल—घेउनि ये पंखा, वाल्याचा )

जार्ज नृपा गावें । सद्भावें । वंदुनिया पदां ॥ ध्रुव ॥

राजा हा अपुला

पावो विमल यशाला !

शत्रूंला

विलयाला

नेवो तो सदा ! ॥ १ ॥

मूर्ती धर्माची !

चिंता सतत प्रजेची

जो वाही !

सुख देई

वारुनि आपदा ॥ २ ॥

कीर्ती–सुमनांनी

जावें भुवन भरोनी !

शांती या

दे पितया,

तैशी संपदा ! ॥ ३ ॥

सौख्याचा ठेवा

त्याच्या पदरिं पडावा

जगदीशा !

ही आशा

पुरवीं तूं सदा ! ॥ ४ ॥

रा. क्र. १००३

# शाळेची प्रार्थना.

( चाल—वरच्याप्रमाणें. )

टीप--शाळेच्या सुरवातीला मुलांनीं शाळेसमोर एका रांगेंत उभें राहून ही प्रार्थना ह्मणावी, व मग आपापल्या वर्गांत जावें.

---

वंदुनिया आधीं । देवाला । शाळेला चला ॥ ध्रु० ॥

नमुनी राजाला
तैसे सकल गुरूंला,
विद्येला
विनयाला
वरण्याला चला ! ॥ १ ॥

सरस्वती जननी
रूपा नविन धरोनी,
अवतरली
ही खालीं !
प्रार्थूं या तिला ! ॥ २ ॥

सद्गुण वाढावे
शीलें विमल बनावें !
ठसवोनी
हें ध्यानीं
अभ्यासा चला ! ॥ ३ ॥

---

# संघाचे नियम

[ टीप--खालील नियमांवरून या संघाच्या थोरवीची कल्पना होईलच. संघाच्या सभासदाचें वर्तन किती उच्च दर्जाचें असलें पाहिजे, हें यावरून स्पष्ट दिसेल. ]

( अभंग )

सर्वांचा विश्वास । सहजीं बसेल
ऐसें शुद्ध शील । ठेवीन मी ॥ १ ॥

देव, राजा, देश । गुरु, आप्त-इष्ट
सर्वां एकनिष्ट । राहीन मी ॥ २ ॥

जीव वांचवाया । अनाथां सहाया
प्रतिदिनीं काया । झिजवीन ॥ ३ ॥

सानां कुरवाळी । वंदिन थोरांना
बंधू सकलांना । मानीन मी ॥ ४ ॥

सौजन्य दावीन । स्त्रिया-बालकांशीं
वृद्ध-निर्बलांशीं । निरपेक्ष ॥ ५ ॥

मुकीं जनावरें । दुःखमुक्त तयां—
व्रत भूतदया । आचरीन ॥ ६ ॥

गुरु, आईबाप । अधिकारी खरे
आज्ञा त्यांच्या त्वरें । पाळीन मी ॥ ७ ॥

पडेल जें काम । कितीही कठीण
मनानें प्रसन्न । करीन तें ॥ ८ ॥

द्रव्य-काळ--व्यय । जपुनी करीन
अनाथां देईन । उरेल तें ॥ ९ ॥

कोसळो संकटें । येवो अपयश
धैर्यें सत्य-कास । धरीन मी ॥ १० ॥

शरिरानें शुद्ध । मनानें निर्मळ
कृतीनें सरळ । राहीन मी ॥ ११ ॥

श्रद्धेनें करीन । निजधर्म-कृत्यें
दुजांचींही मतें । आदरीन ॥ १२ ॥

---

## शपथेचा श्लोक.

प्रभू, तशी जार्ज-नृपाल सेवा
करीन मी शुद्ध धरोनि भावां ॥
झटेन संघा-नियमां नमाया
परोपकारीं झिजवीन काया ॥ १३ ॥

---

[ ४ ]

# ‘ शाळेचा पाळणा ’

( चाल--बाळा जो जो रे लडिवाळा. )

---

॥ बाळा जो जो रे ॥ ध्रू ॥

चिमण्या लडिवाळा ! । शाळेला
ये नियमानें बाळा ॥ १ ॥

झाली व्याकूळ । तुजसाठीं
तुजवर तीची प्रीती ॥ २ ॥

असशी हृदयाचा । तूं लाल
नाहीं तुजला मोल ॥ ३ ॥

फेडिल कीं पांग । हा पुढती
बसली आशेवरती ॥ ४ ॥

ह्मणुनी प्रेमानें । बोलावी
कितीक गोष्टी शिकवी ॥ ५ ॥

धरुनी हृदयाशीं । तुज सुखवी
ज्ञानामृतही भरवी ॥ ६ ॥

शिकवी तुज खेळ । बल यावें
ह्मणुनी जीवें भावें ॥ ७ ॥

संतकथा सांगे । सद्भावे.
सद्गुणमंडित व्हावें ॥ ८ ॥

आहे हा काळ । शिकण्याचा
थोर पुढें होण्याचा ॥ ९ ॥
दे ‘ ओ ’ शाळेच्या । हांकेला
ये धांवत वेळेला ॥ १० ॥
शाळेची एक । ही आस
तुझाच सारा ध्यास ॥ ११ ॥
असल्या प्रेमाचें । सार्थक तूं
करीं; धरीना किंतू ॥ १२ ॥



# 'आठवण'

( चाल—श्रीकृष्ण तो परमात्मा. )

जगतीं कुठेंहि जाऊं
प्रेमें तुलाच गाऊं ॥ ध्रु० ॥
ज्ञानामृतां जयांनीं
पाजून सुज्ञ भुवनीं
केले; तयांस ध्याऊं ॥ १ ॥
देशांत जन्मलेले
बंधूच सर्व अपुले !
हा भाव नित्य ठेवूं ॥ २ ॥
सर्वांस एक माय
वंदूं तिचेच पाय !
नांदूं जगांत भाऊ ॥ ३ ॥
' ना जातपात बघणें
दुबळ्यांस साह्य करणें '
हें ब्रीद स्पष्ट दावूं ॥ ४ ॥
जें जें अम्हांस ठावें
शिकवूं दुजांस भावें
उपकार—भार उतरूं ॥ ५ ॥

[ ६ ]

# सरस्वती !

( चाल--हे प्रभो विभो )

हे सरस्वती ! तुझ्या नमन पदकमलीं
तव ठायीं वृत्ती रमली ! ॥ ध्रु० ॥
विश्वाची चालक शक्ती
असती तूं प्रेमळ मूर्ती !
देवादिक तुजला नमिती
गुण गातां रसना थकली ! ॥ १ ॥
चौसष्ट कला, विद्यांला
शास्त्र–गुणीं गुंफुनि माळा
गणराज अर्पितो तुजला !
करि वृष्टी, सृष्टी सुकली ! ॥ २ ॥
विद्येचा छंदहि ज्याला
तो नमील देवी तुजला !
तव कृपाकटाक्षहि पडला
तत्कंठीं विद्या ठसली ! ॥ ३ ॥

[ ७ ]

# 'बाग.

( चाल--त्यजी भक्तासाठीं लाज )

मी बाग बघाया आलों । पाहुनी, मोहुनी गेलों ॥ध्रु० ॥

हीं फुलें पहा फुललीं
सौंदर्यें बहु खुललीं ॥
शोभा पाहुनि भुललों
मी प्रेमभरें डुललों ! ॥ १ ॥

नवीन पल्लव फुटले
जीर्ण ते गळुनि गेले ॥
देखुनि मोहोराला
आनंद मनीं झाला ! ॥ २ ॥

मधुर फळें हीं आलीं
झाडें तेणें लवलीं ॥
वाटे, मज हीं कथितीं
नम्रता धरी जगतीं ॥ ३ ॥

[ ८ ]

## 'तान्हें रोप'

( चाल—साधी. )

लहानसें होतें बीज
आंत तयाच्या घे नीज ॥
बाळ चिमुकलें तें तान्हें
सृष्टीचें गोजिरवाणें ॥
पाळण्यांत झोले घेई
रजनी त्या गाणीं गाई ॥
प्रभात होतां रवि बोले
"पहा तान्हुल्या ! जग खेळे ॥
ऊठ, पाळणा तूं सोड
जगताशीं मैत्री जोड ॥
शुभ्र रुपेरी तेजांत
खेळ, बाळ गाणीं गात ! ॥ "

\+ × + ×

मोत्यांचा पाउस पडला
बाळाला उठवायाला ॥
दंव–बिंदूच्या स्पर्शानें
पुलकित झालें तें तान्हें ! ॥
वरती मग अपोआप
आलें तें तान्हें रोप ! ॥

बघतां तें गोजिरवाणें
फुलली सृष्टी हर्षानें ॥
रवि खेळे, वारा नाचे !
पल्लव गळले वृक्षांचे ! ॥
सर्व बोलले बाळाला—
**"हो तूं पुढती वृक्ष भला !" ॥**



[ ९ ]

# 'मराठी भाषा'

( चाल—राम स्मरावा राम— )

भाषा अमुची छान । मराठी । भाषा अमुची छान ।। ध्रु० ।।

भाषा भिन्ना देशदेशाच्या
सर्वांची परि खाण ।। मराठी ।। १

बोल बोबडे हिंचेंच वदलों
हिंचेंच केलें पान ।। मराठी ।। २

ज्ञानेश्वर तो तुकारामही
हींतुनि देती ज्ञान ।। मराठी ।। ३

मृदुल, मनोहर, सुंदर वाणी
कविवर गाती गान ।। मराठी ।। ४

ज्याच्या हृदयीं अपुली भाषा
तोच खरा विद्वान् ।। मराठी ।। ५

माता बोले, भाऊ बोले
बोले छबडे सान ।। मराठी ।। ६

म्हणुनी ठसली हृदयीं माझ्या
मागें देवा दान—।। मराठी ।। ७

तुझ्या कृपेनें होवो जगतीं
भाषेचा या मान ।। मराठी ।।

# हिप हिप हुर्रे

ग्रंथ ... 23

(' चाल--ला बाईला ')

---

चेंडूचा । खेळ खेळतो मौजेचा
आनंद । हृदयाचे तोडी बंध !
स्वैरपणीं । मन फिरतें वातावरणीं
जणुं नाचे । फूलपांखरूं गमतीचें !
लवलाही । दुःखाची सावलि नाहीं
त्यांस धरूं
वा मारूं
परि अंतीं । घेऊं त्यां डोक्यावरती ॥ १ ॥
पृथ्वीचा । तारा-मीलन होण्याचा
योग भला । हसवा आतां संध्येला !
टवटवली । सृष्टिसुंदरी भंवताली
ये लाली । स्वर्ग-धरा जेथें जुळली
जल खेळे । वासरांस मंगल बोले—
'झुळझूळ । स्वगृहास जा जा बाळ '
दिवस सरे
खेळ पुरे !
हंबरती । गृहिं जाण्याला ते निघती । ॥ २ ॥

बागडतीं । जशी वासरें ती भवतीं
विहंग ते । उडती बघण्या सूर्यातें
जंव उगवे । अंधारा तेजें दिपवे !
तैसाच । चेंडूचा करवूं नाच
मौजेची । स्वातंत्र्याची घटि अमुची
हक्काची । प्रेमानें बागडण्याची
उपभोगूं,
सुख सेवूं !
हरो कुणी । दुःख तें न कोणी मानी ॥ ३ ॥
जी होई । हारजीत चेंडूपायीं
ती त्याला । डाग न त्याचा आह्मांला
अह्मि भाऊ । उद्यां पुन्हां खेळा येऊं !
आलिंगूं । खेळाच्या गोष्टी सांगूं
घरीं त्वरें । हासत जाऊं प्रेमभरें
ताल धरा
सर्व जरा !
घटि सरली । हिप हिप हुर्रे झाली ? ॥ ४ ॥

[ ११ ]

## ‘ मायभूमी ! ’

( चाल...जरी कुणा श्रीमंताची... )

असो मायभूमी माझा तुला नमस्कार
देह तुझ्या सेवे लागो आस हीच फार ॥ ध्रु० ॥

तुझें गीत गातां देवी कसा कंठ दाटे !
स्मृती होय इतिहासाची, प्रेम मनीं लोटे
श्रेष्ठ वीर दिसती नयनीं मावळे मराठे
स्वप्न वदो कोणी याला गमे सत्य-सार ! ॥ १ ॥

शूर मर्द बाजी, राघो, तसे फडणवीस
तुकाराम, ज्ञानोबा वा संत रामदास—
अलंकार घालुनि चमके श्रेष्ठ महाराष्ट्र !
वीर, संत झाले येथें खचित थोर, थोर ! ॥ २ ॥

तुझे पांग फेडूं कैसे, हीन, दीन आज
थोर पुरुष स्मरतां वाटे मला माझि लाज !
अंत नको पाहूं देवी, करिव कामकाज
कळस जरी झालों नाहीं, वाहिन मी भार ! ॥ ३ ॥

श्रेष्ठ असे अपुल्या परिनें दगड पायऱ्याचा
दृष्टिआड राहुनि वाही भार मंदिराचा !
कुणाच्याहि पुण्यें गवसो मार्ग उद्धराचा
दगड अम्ही लाखो मिळुनी, साह्य करूं त्यास ! ॥ ४ ॥

९८०३

# विडीचा तुकडा

( चाल...राजहंस माझा निजला... ).

एक मुलगाः—

चिंतातुर कां तूं बाळा
ही दशा कशानें झाली ?
फाटले अंगिचे कपडे
ओठांची गेली लाली !
पांढऱ्या दंतपंक्तींची
हासरी कळी मावळली !
चाल....पोटाला खळगी पडली !
आठ्यांची गर्दी भालीं
गालिंची गुलाबी सरली !
दिसतो कां रडवा नूर ?
कां स्फुंदत येतो सूर ? ॥ १ ॥

दुसरा मुलगाः—

या तुझ्या सर्व प्रश्नांचें
उत्तर तें एकच जाण !
घेतला विडीचा झुरका
जाळले ओठ व प्राण !

जरि दांत कीडती पडती

आवडे तमाखू घाण.

चाल....शाळेस तिळांजलि दिधली !

चिरुटांची संगत धरली !

पोटाची भ्रांती पडली !

परि अजुनी काढी धूर

जरि येतो रडका सूर ॥ २ ॥

व्यसनांत घालतां पाय

सद्गुणांस माती मिळते !

थोटके बिडीचे तुकडे—

हा मार्ग व्यसन-गर्तेतें !

परि तोच बिडीचा तुकडा

नेतसे भक्ष्य मृत्यूतें !

चाल....अंगातिल शक्ती सरली,

बुद्धीवर धुंदी चढली !

'**गांजेकस**' पदवी आली !

परि अजुनी काढी धूर

जा बाळा, जा तूं दूर ॥ ३ ॥

[ १३ ]

# ‘ आमचा सखा ! ’

चालः—साधी

सखा आमुचा कोण असे
उदारधी तो कुठें वसे ?
नांव जयाचें हृदीं धरूं
अभिमानानें पाठ करूं ॥ १ ॥

धैर्य अचल तें सदा असे
अनुपम लोकीं शौर्य दिसे !
होय जयाची ती ख्याती
वीर-सखा ह्मणुनी जगतीं ॥ २ ॥

भय न संकटीं कधीं धरी
सत्य भाषणां नित्य करी !
कर्तव्यहि जंव पुढें दिसे
तंव न कुणाला मार्ग पुसे ॥ ३ ॥

वैभवीं न ज्या मद चढतो
खेद न दुःखीं मुळि होतो !
स्वदेशकार्यीं बहु झटतो
जीव त्यापुढें अवगणितो ॥ ४ ॥

दुर्बलांस जोडी हात
राक्षसांस हाणी लाथ !
गरिबांशीं नातें जोडी
धनापुढें छाती काढी ॥ ५ ॥
निज-धर्माचा कैवार,
करी दुजावर ना वार ;
धर्म, देश, राजा, जाण
कीर्ति, शील पंचप्राण ! ॥ ६ ॥
सखा आमुचा तोच असे
मूर्ति तयाची हृदीं वसे ॥ ७ ॥
नांव तयाचें नृत्य करी
थै थै रसनेच्या द्वारीं

# समारंभाची पदें

[ शाळेंतील कोणत्या तरी समारंभाच्या वेळीं हीं पदें म्हणतां येण्यासारखीं आहेत. समारंभाला अनुसरून असलेल्या पदांतील हवी असतील तेवढी कडवीं शिक्षकांनीं निवडून घ्यावीं. ]

## ( अ )

( चाल--भक्तजन सदा )

---

श्रेष्ठ पातले । नमित तया प्रीतिजलें ॥ ध्रु० ॥

स्वागतास आजि जमुनी
छात्र सर्व करिति हसुनि !
दृष्टी विमल
ठेवा सकल !
हात जोडले ! ॥ १ ॥

ज्ञान, शील, शरिर तसे
वाढवणें ध्येय असे !
हेतू ठेवुनि
संधा स्थापुनि
धन्य जाहले ! ॥ २ ॥

बंधुभाव जगीं पसरो
अंधकार नष्ट करो
राष्ट्रीं विजय
होवो उदय
प्रभुस विनविले ! ॥ ३ ॥

## ( ब )

( चाल:—गडे लीले. )

---

सदा प्रीती । धरुनि चित्तीं
सेवुं भूपां भारतीं ॥ ध्रु० ॥
शाला अमुची आज आपुल्या
चरणीं करि प्रणती ॥ प्रेमें ॥
स्वागत करितें, एक मागतें
वाढो बल, कीर्ती ॥ इथली ॥

* * *

## ( क )

( चाल:—होइल कलह ह्मणोनी. )

---

शिक्षण—कार्य ह्मणोनी
जमलां सारे प्रेम धरोनी ॥ ध्रु० ॥
आंग्ल—संस्कृती आली येथें
प्रेमें मिळण्या या संस्कृतितें !
भारत—दैव ह्मणोनी
संगम खासा दिसतो नयनीं ॥ १ ॥
चारी बाजूं दिसती शाला
न्याया देशा या उन्नतिला !
ज्ञान खरें मिळवोनी
स्वर्गच होइल अपुली अवनी ! ॥ २ ॥

भावी आशा या देशाची
कास धरी हो प्रेमें तुमची !
ज्ञानामृत पाजोनी
सुज्ञ करा जग, सकल मिळोनी ! ॥ ३ ॥

( ड )

( चाल--आलि कालिं या )

---

खचित आज हा सुदिन उगवला ॥ ध्रु० ॥
उत्सवदिन हा आहे म्हणुनी
प्रगती अपुली
दावूं सकलां ॥ १ ॥
वर्षभराच्या परिश्रमाचे
फल मिळण्याची
आली वेळा ॥ २ ॥
थोर मनाचे मेहू आले
पारितोषिकें
वाटायाला ॥ ३ ॥
ठेवो त्यांना सदा सुखीं, ही
विनती अपुली
परमेशाला ! ॥ ४ ॥

* * * * *

( फ )

( चाल—रमवाया जाऊं )

---

थोर चला होऊं । जगीं या ॥ ध्रु० ॥
उन्नति अपुली व्हावी जगतीं

ऐशीं आशा धरुनी चित्तीं
सन्मार्गें जाऊं ॥ १ ॥
सदृढ शरिरीं सुंदर मन तें
नित्य राहतें, अपणां कळतें
बल शरिरीं कमवूं ॥ २ ॥
विद्यार्जन नित करणें अपुलें
कर्तव्य असे जगतीं पहिलें !
ज्ञान—दान घेऊं ॥ ३ ॥
उत्तेजन हें आह्मां द्याया
आला सारे प्रेमें ठाया !
आभारी होऊं ॥ ४ ॥

* * * * *

( ग )

( चाल—अर्पिलें सुमन पूर्विच— )

---

त्या **जार्ज** नृपाला स्मरणें आतां उरलें
तो असो सुखीं हें पहिलें
मागणें आज हो अपुलें !
वंदुनी, त्या मनीं धन्य विश्व जाहलें ! ॥ १ ॥
त्या जार्ज नृपाला स्मरणें आतां उरलें
सद्गुणीं मन खरें रमलें
चित्तांत प्रेमही भरलें !
घ्या तरी, माधुरी नामिं भरुनि राहिली ! ॥ २ ॥

---

[ १५ ]

# हौस.

( चाल—आनंदाचा कंद )

( टिपऱ्या खेळतांना म्हणावें. )

नाचूं, खेळूं, धरुनी ताला प्रेमें गाणीं गाउनी
वाजवुं टिपऱ्या, गिरक्या घेऊं मित्रासंगें हांसुनी ॥ध्रु०॥

हृदयामधल्या मधु वृत्तींच्या सुंदर गोफा गुंफुनी
प्रेमळतेच्या कारंजाचे तुषार भंवती सोडुनी ॥ १ ॥

'सुंदर कृत्यें'–याच फुलांचें मंगल तोरण बांधिलें
'जैसे बोलूं तैसे चालूं'–संतपदांला वंदिले ॥ २ ॥

'उंच भरारी खुशाल मारी'—कर्तव्याला सांगुनीं
गुढी उभारू सत्याची ही जगतां टाकूं मोहुनी ॥ ३ ॥

परोपकारासंगें चालूं ध्येयाच्याही मागुती
अंधांचीही होउनि काठी राहूं सुखेंच भारतीं ॥ ४ ॥

एकच भाषा, एकच आशा एकच विनती श्रीहरी
ज्ञानाचा तूं दीप लावरे ! प्रकाश पाडी अंतरीं ॥ ५ ॥

[ १६ )

# ‘ प्रियकर हिंदिस्तान ’

( चाल--माळिण नवतरणी-- )

प्रियकर हिंदिस्तान
अमुचा प्रियकर हिंदिस्तान ! ॥ ध्रु० ॥
हा अलंकार हो भूगोलाच ! यास नसे उपमान !
सर्व सुखाची खाण
अमुच्या सर्व सुखाची खाण !
हें अभिमानाचें सौभाग्याचें, अमुच्या रम्य निधान !
हे जन्मभूमि ! हें तनमनधन घें तुला !
तव उपकारांना न मिळे कोठें तुला !
हें फिटणें साध्य न आह्मां अतिदुर्बलां !
सुखकर तव गे ध्यान !
निरंतर सुखकर तव गे ध्यान !
जो जननीचा, जो जनकाचा गे तोच तुझाही मान !

**नारायण वामन टिळक.**

REFBK-0001703
REFBK-0001703

# जय ब्रिटॅनिये !

ब्रिटॅनिये जय ! ब्रिटॅनिये ! ॥ ध्रु० ॥
जगदीशाची तूं प्रिय भारी
तोच दयाघन तव कैवारी,
तूंहि तयाला वश विनये ! ॥ब्रिटॅनिये ॥ १
किती संकटें आलीं, गेलीं
सोपानासम तीं तुज झालीं!
सदा मंडिता तूं विजये ! ॥ ब्रिटॅनिये ॥ २
सागर अवघे तव यश गाती,
मान्य तुझ्या नियमाला जगती,
कुणी तुझें बळ तुळूं नये ! ॥ ब्रिटॅनिये ॥ ३
नीतिशांतिसुख यांची दात्री,
हानिशक्ति राष्ट्रांची धात्री,
तुला नेमिता प्रभु स्वयें ! ॥ ब्रिटॅनिये ॥ ४
तुझें आणखी हिंदभूमिचे
नातें प्रेमळ, सुंदर साचें,
हेंच करावें दृढ सदयें, ॥ ब्रिटॅनिये ॥ ५

**नारायण वामन टिळक.**